नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ , परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

औरंगाबाद कृषि हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक – ०९.०६.२०२०**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १० जून २०२० ते १४ जून २०२०)				
दिनांक	१०/०६	११/०६	१२/०६	१३/०६	१४/०६
पाऊस (मिमी)	०५.०	०३.०	१०.०	०९.०	२६.०
कमाल तापमान (अं.से.)	३४.०	३४.०	३४.०	३४.०	३४.०
किमान तापमान (अं.से.)	२३.०	२४.०	२४.०	२४.०	२४.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८९	८६	८७	८६	८९
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	५५	५०	५०	५१	५६
वा-याचा वेग (किमी / तास)	११	१३	१३	०८	१२
वा-याची दिशा	पश्चिम	पश्चिम	पश्चिम	पश्चिम	पश्चिम

हवामानाचा इशारा	पुढील पाच दिवसात आकाश अंशत: ढगाळ ते ढगाळ राहील. दिनांक ११ व १३ जुन २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार तसेच दिनांक १४ जुन २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	**अवस्था**	**कृषि हवामान सल्ला**
कापूस	आंतरपीक	बीटी कपाशीमध्ये कापूस + तूर (६ : १ किंवा ८ : २ किंवा १० : २), कापूस + सोयाबीन (१ : १), कापूस + मुग (१ : २), कापूस + उडीद (१ : १) ही आंतरपीक पध्दती घेतल्यास फायदेशीर ठरते.
तुर	आंतरपीक	तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच जमिनीची उत्पादकता राखण्यासाठी तुर + बाजरी (१ : २ किंवा २ : ४), तुर + ज्वारी (३ : ३ किंवा २ : ४), तुर + कापूस (१ : ६ किंवा १ : ८) आणि तुर + सोयाबीन / मुग / उडीद (१ : २ किंवा २ : ४) असे ओळीचे प्रमाण ठेवून फायदेशीर आंतरपीक पध्दतीचा वापर केल्यास अधिक फायदा होतो.
मुग / उडीद	आंतरपीक	आंतरपीक म्हणून मुग / उडीद या पिकांना विशेष महत्व प्राप्त आहे, ते या पिकांच्या कालावधीमुळे, हे दोन्हीही पिके तुर, ज्वारी, कपाशीत आंतरपीक म्हणून घेता येतात.
भुईमूग	आंतरपीक	भुईमूगापासून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्यास भूईमुग + तीळ (६ : २), भूईमुग + सुर्यफूल (६ : २), भुईमूग + कापूस (२ : १), भुईमूग + तुर (६ : २) या प्रमाणात पेरणी करून दोन्ही पिकांचे अधिक उत्पादन मिळते.
मका	आंतरपीक	मका या पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी आंतरपीक महत्वाचे आहे. आंतरपिकासाठी कडधान्ये (उडीद, मुग, चवळी), तेलबिया (भुईमूग, सोयाबीन), भाजीपाला (मेथी, कोबी, कोथिंबीर, पालक) इत्यादी पिकांची लागवड करावी.
केळी	लागवड	पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन केळी फळबागेची लागवड करू नये. पुर्वी लागवड केलेल्या बागेत आंतरमशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी.
आंबा	लागवड	पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन आंबा फळबागेची लागवड करू नये. बागेत आंतरमशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी.

द्राक्ष	वाढीची अवस्था	बागेत आंतरमशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी.
सिताफळ	लागवड	पुरेशा पाऊस झाल्याशिवाय नवीन सिताफळ फळबागेची लागवड करू नये. बागेत आंतरमशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी.
भाजीपाला	रोपे तयार करणे	पाण्याची उपलब्धता असलेल्या शेतक-यांनी भाजीपाला पिकाची गादी वाफयावर रोपे तयार करण्यासाठी बी टाकले नसल्यास टाकून घ्यावे. बी टाकलेल्या गादी वाफयावर वेळोवेळी झा-याच्या साहयाने पाणी दयावे.
फुलशेती	रोपे तयार करणे	पाण्याची उलपब्धता असलेल्या शेतक-यांनी हंगामी फुलपिकांच्या लागवडीसाठी गादीवाफयावर बी टाकून रोपे तयार करावी.
तुती रेशीम उदयोग	--	तुती बागेस इतर पिकाच्या तुलनेत कमी पाणी लागते. १.५ एकर इंच प्रत्येक वेळी याप्रमाणे ७० दिवसाच्या पिकास ५ ते ६ वेळा पाणी दयावे. एकरी वार्षीक ४५ लाख लिटर पाणी लागते. ठिबक सिंचन केल्यास पाण्याची ५० टक्के बचत होऊन २३ लाख लिअर पाणी लागते. तुती पट्टा पध्दत लागवडीत आच्छादन केल्यास १५ लाख लिटर पाणी लागते.
पशुधन व्यवस्थापन	--	पशुधनास तज्ञ पशुवैदयकाकडून घटसर्प, फ-या रोग प्रतिबंधक लसी दयाव्यात.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.